Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- VIII ISSUE- II FEBRUARY 2021 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.149 ISSN 2349-638x

# विदर्भाच्या ग्रामीण व शहरी भागातील क्रीडापटुंच्या सामाजिक बुद्धीमत्तेचा तुलनात्मक अभ्यास

**अमित केशवराव काकडे**
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,
नागपूर

**डॉ. विजय वासुदेवराव धोटे**
प्राचार्य
अरविंदबाबू देशमुख महाविद्यालय, भारसिंगी,
ता. नरखेड, जिल्हा नागपूर

## १.० प्रस्तावना

क्रीडापटुंच्या सर्वांगीण विकासात ज्ञानसंवर्धन, बौद्धिक व वैचारिक विकास, व्यावहारिक कार्यक्षमता, शारीरिक स्वास्थ, सामाजिकता, सौंदर्याभिरूची व रसिकता, नैतीकता क्रियाशीलता व सृजनशीलता अशा सर्व घटकांचा अंतर्भाव होतो व हया विकासात त्यांच्या खेळांची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. कारण खेळ ही एक सामाजिकरणाची संस्था आहे. खेळामुळे व्यक्तीचे जीवन सुखी व आनंदी बनते व समाजात मानाचे स्थान मिळून संघवृत्ती, बंधुत्वाची भावना, सहकार्य, सामाजिक गुणांचा विकास, आज्ञाधारकता, सहनशीलता, तत्परता, सत्यता, समायोजन, इ. गुणांचा विकास होऊन खेळाडू एक उत्कृष्ट नागरीक बनण्यास पात्र ठरतो.

पूर्वी खेळाला वैज्ञानिक दृष्टिकोनातून बघितल्या जात नव्हते. मात्र आज प्रत्येक खेळात वैज्ञानिक घटकांचा प्रभाव पडलेला दिसून येतो. आज खेळात किंवा खेळाच्या स्पर्धेत वैज्ञानिक घटकांच्या प्रयोगामुळे खेळाडू आपल्या क्षमतेला उंच शिखरावर पोहोचवितो आहे, ज्यांची अनेक वेळा कल्पना केली जाऊ शकत नाही. आज खेळात स्पर्धा इतकी वाढली आहे की दिनप्रतिदिन काही जुने किर्तिमान मोडले जात आहेत व नवीन किर्तिमान घडत आहेत, याचे कारण म्हणजे खेळात वैज्ञानिक घटकांचा प्रयोग विविध प्रकारच्या प्रशिक्षणाद्वारे आजचा खेळाडू एक यंत्र बनलेला आहे, त्या खेळाडूला तयार करण्याकरिता प्रत्येक स्तरावर वैज्ञानिक पद्धतीचा अंगीकार केला जातो आहे.

आजच्या क्रीडापटुला केवळ शारीरिकरीत्या सक्षम न राहता मानसिक दृष्ट्या देखील सशक्त असणे आवश्यक आहे. याकरीता भावनिक बुद्धीमत्ता हा एक महत्त्वपूर्ण घटक आहे. आपण अनेकदा सभोवताली अशा व्यक्ती बघतो, ज्या अतिशय बुद्धिमान व हुशार असतात, मात्र आयुष्यातील साधी आव्हाने स्वीकारणे त्यांना अतिशय अवघड जाते. अनेकदा कामाच्या ठिकाणी पुरेशी 'बुद्धिमत्ता' असूनही फारशी प्रगती साधता येत नाही. भावनिक बुद्धिप्रामाण्याच्या प्रमाणे भावनिकरीत्या व्यक्त होता येणे हे विविध प्रसंगांमध्ये तग धरून ठेवण्यासाठी आवश्यक असते. सर्वसामान्यत: 'बुद्धिमत्ता' या शब्दामधून ज्या प्रकारच्या क्षमतांची अपेक्षा केली जाते, त्यापलीकडे जाऊन मानवी भावनांवर आधारित बुद्धिमापनाची नवीन प्रणाली विकसित करण्यात आली व याचा विदेशातील क्रीडाक्षेत्रात फार मोठ्या प्रमाणात वापर होतो आहे. भावनिक बुद्धिमत्ता (Emotional Intelligence) हा तुलनेने नवीन असा संशोधनाचा व अभ्यासाचा विषय आहे. भावनिक बुद्ध्यांक जास्त असणाऱ्या व्यक्ती कामाच्या ठिकाणी अधिक यशस्वी होतात, असे अनेक संशोधनकार्यात सिद्ध झाले आहे. भावनिक बुद्धीमत्ता हा व्यक्तीमत्वाचा असा गुणधर्म आहे जो बाह्य घटकांवर अवलंबून असतो. यामुळे खेळाडू कोणत्या भागांत (ग्रामीण अथवा शहरी) राहतात याचा त्यांच्या भावनिक बुद्धीमत्ता विकासात मोठा प्रभाव असतो. वरील सर्व बाबींच्या अनुशंगाने प्रस्तुत संशोधनकार्यात विदर्भाच्या ग्रामीण व शहरी भागातील क्रीडापटुंच्या भावनिक बुद्धीमत्ता स्तराची तुलना करण्यात आली आहे.

**२.० संशोधन पद्धती**

संशोधन कार्यासाठी निर्दोष माहिती मिळण्यासाठी व संशोधनाची उद्देशपूर्ती होण्यासाठी संशोधनाची उद्दिष्टे अभ्यासून त्यानुसार संशोधन करण्याकरिता सर्वेक्षण पद्धतीचा उपयोग करण्यात आला.

**२.१ अध्ययन विश्व :**

प्रस्तूत संशोधनकार्यात विदर्भातील नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली या जिल्हयांचा अध्ययन विश्व म्हणून विचार करण्यात आला.

**२.२ जनसंख्या, न्यादर्श पद्धती, न्यादर्श व नमुना निवड :**

प्रस्तुत संशोधनामध्ये विदर्भातील सर्व खेळाडू जनसंख्येत मोडतात. प्रस्तुत संशोधनकार्यात निवडण्यात आलेला नमुना संपूर्ण अध्ययन विश्वाचे प्रतिनिधीत्व करणारा आहे याची खबरदारी संशोधनकर्त्याने घेतलेली आहे. संभाव्यता पद्धतीतील साधा यादृच्छिक नमुना निवडण्यात आला आहे. प्रस्तुत अध्ययनात विदर्भातील नागपूर विभागातील ६ जिल्ह्यामधून ग्रामीण व शहरी भागातील प्रत्येकी ५० पुरूष खेळाडूंची निवड करण्यात आली व हे प्रस्तुत संशोधनामध्ये न्यादर्श आहे. याप्रमाणे प्रस्तुत अध्ययनात एकूण ६०० खेळाडूंची निवड करण्यात आली. खेळाडूंची वयोमर्यादा १२ ते १६ वर्षे होती.

**२.३ संशोधनाची साधने**

ग्रामीण व शहरी भागातील खेळाडूंच्या सामाजिक बुद्धीमत्ता स्तराचे मापन एन्. के. चड्ढा व उशा गणेसन द्वारे निर्मित सामाजिक बुद्धीमत्ता चाचणी (Social Intelligence Scale) चा वापर करून करण्यात आले.

२.४ **तथ्यांचे सांख्यिकीय विश्लेषण**

तथ्य संकलनानंतर सांख्यिकीय तंत्रातील विविध ग्राहयता चाचणीचा विशेषत्वाने काई वर्ग मुल्य (Chi-Square Test) या चाचणीचा उपयोग करण्यात आला व त्या आधारावर निष्कर्ष काढण्यात आले. Significance level 0.05 निर्धारीत करण्यात आली.

**३.० माहितीचे सांख्यिकीय विश्लेषण व विवेचन**

**३.१ सामाजिक बुद्धीमत्ता — संयम घटक**

**सारणी क्रं. १:** ग्रामीण व शहरी भागातील खेळाडूंच्या सामाजिक बुद्धिमत्तेच्या संयम या घटकाची तुलना दर्शविणारी सारणी

| स्तर | ग्रामीण भागातील खेळाडू | | शहरी भागातील खेळाडू | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | प्रतिशत | संख्या | प्रतिशत |
| निम्न | ३८ | १२.७ | ३९ | १३.० |
| मध्यम | ४७ | १५.७ | १७१ | ५७.० |
| सरासरी | १६८ | ५६.० | ४२ | १४.० |
| उच्च्च | २९ | ९.७ | ३९ | १३.० |
| अत्यंत उच्च | १८ | ६.० | ९ | ३.० |
| एकुण | ३०० | १००.० | ३०० | १००.० |

**काई–वर्गमूल्य: १५०.६१६; स्वातंत्र्यांश:** ४;
**Pमूल्य**= <0.05; **तालिका मूल्य**: ९.४९

वरील सारणी क्र. १ मध्ये विदर्भाच्या ग्रामीण व शहरी भागातील खेळाडूंच्या सामाजिक बुद्धिमत्तेच्या संयम या घटकाची तुलना दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ग्रामीण भागातील १२.७ टक्के व १३.० टक्के ग्रामीण व शहरी भागातील खेळाडूंचे संयम निम्न स्तराचे आहे. त्याचप्रमाणे १५.७ टक्के व ५७.० टक्के ग्रामीण व शहरी भागातील खेळाडूंचा संयम मध्यम स्तराचा व ५६.० टक्के व १४.० टक्के ग्रामीण व शहरी भागातील खेळाडूंचा संयमाचा स्तर सरासरी असल्याचे आढळले. त्याचप्रमाणे ९.७ टक्के ग्रामीण भागातील व १३.० टक्के शहरी भागातील खेळाडूंचा संयमाचा स्तर उच्च आहे. तसेच ६.० टक्के ग्रामीण भागातील व ३.० टक्के शहरी भागातील खेळाडूंचा संयमाचा स्तर अत्यंत उच्च असल्याचे निदर्शनास आले.

३.२ **सामाजिक बुद्धीमत्ता — सहकारिता घटक**

**सारणी क्रं. २:** ग्रामीण व शहरी भागातील खेळाडूंच्या सामाजिक बुद्धिमत्तेच्या सहकारिता या घटकाची तुलना दर्शविणारी सारणी

| स्तर | ग्रामीण भागातील खेळाडू | | शहरी भागातील खेळाडू | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | प्रतिशत | संख्या | प्रतिशत |
| निम्न | २५ | ८.३ | ४४ | १४.७ |
| मध्यम | ६९ | २३.० | ५२ | १७.३ |
| सरासरी | ४७ | १५.७ | १२८ | ४२.७ |
| उच्च | १०६ | ३५.३ | ५२ | १७.३ |
| अत्यंत उच्च | ५३ | १७.७ | २४ | ८.० |
| एकुण | ३०० | १०००.० | ३०० | १०००.० |

**काई–वर्गमूल्य:** ७४.४९; **स्वातंत्र्यांश:** ४; **Pमूल्य=** <0.05; **तालिका मूल्य:** ९.४९

वरील सारणी क्र. २ मध्ये विदर्भाच्या ग्रामीण व शहरी भागातील खेळाडूंच्या सामाजिक बुद्धिमत्तेच्या सहकारिता या घटकाची तुलना दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ग्रामीण भागातील ८.३ टक्के व १४.७ टक्के ग्रामीण व शहरी भागातील खेळाडूंची सहकारिता निम्न स्तराची आहे. तसेच २३.० टक्के व १७.३ टक्के ग्रामीण व शहरी भागातील खेळाडूंची सहकारिता मध्यम तर १५.७ टक्के व ४२.७ टक्के ग्रामीण व शहरी भागातील खेळाडूंच्या सहकारितेचा स्तर सरासरी असल्याचे आढळले. तसेच ३५.३ टक्के ग्रामीण भागातील व १७.३ टक्के शहरी भागातील खेळाडूंची सहकारिता उच्च्व असून १७.७ टक्के ग्रामीण भागातील व ८.० टक्के शहरी भागातील खेळाडूंच्या सहकारितेचा स्तर अत्यंत उच्च असल्याचे निदर्शनास आले.

**३.३ सामाजिक बुद्धीमत्ता — आत्मविश्वास घटक**

**सारणी क्रं. ३:** ग्रामीण व शहरी भागातील खेळाडूंच्या सामाजिक बुद्धिमत्तेच्या आत्मविश्वास या घटकाची तुलना दर्शविणारी सारणी

| स्तर | ग्रामीण भागातील खेळाडू | | शहरी भागातील खेळाडू | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | प्रतिशत | संख्या | प्रतिशत |
| निम्न | ३४ | ११.३ | २९ | ९.७ |
| मध्यम | ६९ | २३.० | ६४ | २१.३ |
| सरासरी | १३७ | ४५.७ | ६३ | २१.० |
| उच्च्व | ४० | १३.३ | १०९ | ३६.३ |
| अत्यंत उच्च | २० | ६.७ | ३५ | ११.७ |
| एकुण | ३०० | १००.० | ३०० | १००.० |

**काई–वर्गमूल्य:** ६४.००९; **स्वातंत्र्यांश:** ४; **Pमूल्य=** <0.05; **तालिका मूल्य:** ९.४९

वरील सारणी क्र. ३ मध्ये विदर्भाच्या ग्रामीण व शहरी भागातील खेळाडूंच्या सामाजिक बुद्धिमत्तेच्या आत्मविश्वास या घटकाची तुलना दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ग्रामीण भागातील ११.३ टक्के व ९.७ टक्के ग्रामीण व शहरी भागातील खेळाडूंचे आत्मविश्वास निम्न आहे. तसेच २३.० टक्के व २१.३ टक्के ग्रामीण व शहरी भागातील खेळाडूंचे आत्मविश्वास मध्यम असून ४५.७ टक्के व २१.० टक्के ग्रामीण व शहरी भागातील खेळाडूंचे आत्मविश्वास सरासरी असल्याचे आढळले. त्याचप्रमाणे १३.३ टक्के ग्रामीण भागातील व ३६.३ टक्के शहरी भागातील खेळाडूंचे आत्मविश्वास उच्च आहे तर ६.७ टक्के ग्रामीण भागातील व ११.७ टक्के शहरी भागातील खेळाडूंचे आत्मविश्वास अत्यंत उच्च असल्याचे निदर्शनास आले.

**३.४ सामाजिक बुद्धीमत्ता — संवेदनशीलता घटक**

**सारणी क्रं. ४:** ग्रामीण व शहरी भागातील खेळाडूंच्या सामाजिक बुद्धिमत्तेच्या संवेदनशीलता या घटकाची तुलना दर्शविणारी सारणी

| स्तर | ग्रामीण भागातील खेळाडू | | शहरी भागातील खेळाडू | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | प्रतिशत | संख्या | प्रतिशत |
| निम्न | १३ | ४.३ | ४९ | १६.३ |
| मध्यम | ३० | १०.० | ७१ | २३.७ |
| सरासरी | १४७ | ४९.० | १३३ | ४४.३ |
| उच्च्व | ६७ | २२.३ | ३० | १०.० |
| अत्यंत उच्च्व | ४३ | १४.३ | १७ | ५.७ |
| एकुण | ३०० | १००.० | ३०० | १००.० |

**काई–वर्गमूल्य:** ६३.६२७; **स्वातंत्र्यांश:** ४; **Pमूल्य=** <0.05; **तालिका मूल्य:** ९.४९

वरील सारणी क्र. ४ मध्ये विदर्भाच्या ग्रामीण व शहरी भागातील खेळाडूंच्या सामाजिक

बुद्धिमत्तेच्या संवेदनशीलता या घटकाची तुलना दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ग्रामीण भागातील ४.३ टक्के व १६.३ टक्के ग्रामीण व शहरी भागातील खेळाडूंची संवेदनशीलता निम्न स्तराची आहे. त्याचप्रमाणे १०.० टक्के व २३.७ टक्के ग्रामीण व शहरी भागातील खेळाडूंच्या संवेदनशीलतेचा स्तर मध्यम असून ४९.० टक्के व ४४.३ टक्के ग्रामीण व शहरी भागातील खेळाडूंची संवेदनशीलता सरासरी असल्याचे आढळले. तसेच २२.३ टक्के ग्रामीण भागातील व १०.० टक्के शहरी भागातील खेळाडूंची संवेदनशीलता उच्च असून १४.३ टक्के ग्रामीण भागातील व ५.७ टक्के शहरी भागातील खेळाडूंच्या संवदेनशीलतेचा स्तर अत्यंत उच्च असल्याचे निदर्शनास आले.

### ३.५ सामाजिक बुद्धीमत्ता — सामाजिक पर्यावरण ओळख घटक

**सारणी क्रं. ५:** ग्रामीण व शहरी भागातील खेळाडूंच्या सामाजिक बुद्धिमत्तेच्या सामाजिक पर्यावरण ओळख या घटकाची तुलना दर्शविणारी सारणी

| स्तर | ग्रामीण भागातील खेळाडू | | शहरी भागातील खेळाडू | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | प्रतिशत | संख्या | प्रतिशत |
| निम्न | ३४ | ११.३ | ४७ | १५.७ |
| मध्यम | ६८ | २२.७ | २०२ | ६७.३ |
| उच्च | १९८ | ६६.० | ५१ | १७.० |
| एकुण | ३०० | १००.० | ३०० | १००.० |

**काई—वर्गमूल्य:** १५५.३७३; **स्वातंत्र्यांश:** २;
**Pमूल्य=** <0.05; **तालिका मूल्य:** ५.९९

वरील सारणी क्र. ५ मध्ये विदर्भाच्या ग्रामीण व शहरी भागातील खेळाडूंच्या सामाजिक बुद्धिमत्तेच्या सामाजिक पर्यावरण ओळख या घटकाची तुलना दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ग्रामीण भागातील ११.३ टक्के व शहरी भागातील १५.७ टक्के खेळाडूंची सामाजिक पर्यावरण ओळख निम्न स्तराची आहे. तसेच २२.७ टक्के व ६७.३ टक्के ग्रामीण व शहरी भागातील खेळाडूंची सामाजिक पर्यावरण ओळख मध्यम स्तराची असल्याचे आढळले. त्याचप्रमाणे ६६.० टक्के ग्रामीण भागातील व १७.० टक्के शहरी भागातील खेळाडूंची सामाजिक पर्यावरण ओळख उच्च स्तराची असल्याचे निदर्शनास आले.

### ३.६ सामाजिक बुद्धीमत्ता — व्यवहारचातुर्य घटक

**सारणी क्रं. ६:** ग्रामीण व शहरी भागातील खेळाडूंच्या सामाजिक बुद्धिमत्तेच्या व्यवहारचातुर्य या घटकाची तुलना दर्शविणारी सारणी

| स्तर | ग्रामीण भागातील खेळाडू | | शहरी भागातील खेळाडू | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | प्रतिशत | संख्या | प्रतिशत |
| निम्न | ३७ | १२.३ | ६३ | २१.० |
| मध्यम | ९८ | ३२.७ | १५९ | ५३.० |
| उच्च | १६५ | ५५.० | ७८ | २६.० |
| एकुण | ३०० | १००.० | ३०० | १००.० |

**काई—वर्गमूल्य:** ५२.३८७; **स्वातंत्र्यांश:** २;
**Pमूल्य=** <0.05; **तालिका मूल्य:** ५.९९

वरील सारणी क्र. ६ मध्ये विदर्भाच्या ग्रामीण व शहरी भागातील खेळाडूंच्या सामाजिक बुद्धिमत्तेच्या व्यवहारचातुर्य या घटकाची तुलना दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ग्रामीण भागातील १२.३ टक्के व २१.० टक्के ग्रामीण व शहरी भागातील खेळाडूंचे व्यवहार चातुर्य निम्न स्तराचे आहे. त्याचप्रमाणे ३२.७ टक्के व ५३.० टक्के ग्रामीण व शहरी भागातील खेळाडूंचे व्यवहार चातुर्य मध्यम असल्याचे आढळले. तसेच ५५.० टक्के ग्रामीण भागातील व २६.० टक्के शहरी भागातील खेळाडूंचे व्यवहार चातुर्य उच्च्य असल्याचे निदर्शनास आले.

### ३.७ सामाजिक बुद्धीमत्ता – विनोदबुद्धी घटक

**सारणी क्रं. ७:** ग्रामीण व शहरी भागातील खेळाडूंच्या सामाजिक बुद्धिमत्तेच्या विनोदबुद्धी या घटकाची तुलना दर्शविणारी सारणी

| स्तर | ग्रामीण भागातील खेळाडू | | ाहरी भागातील खेळाडू | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | प्रतिशत | संख्या | प्रतिशत |
| निम्न | ४१ | १३.७ | ४४ | १४.७ |
| मध्यम | ७० | २३.३ | ५४ | १८.० |
| उच्च | १८९ | ६३.० | २०२ | ६७.३ |
| एकुण | ३०० | १००.० | ३०० | १००.० |

**काई–वर्गमूल्य:** २.६०३; **स्वातंत्र्यांश:** २;
**Pमूल्य=** <0.05; **तालिका मूल्य:** ५.९९

वरील सारणी क्र. ७ मध्ये विदर्भाच्या ग्रामीण व शहरी भागातील खेळाडूंच्या सामाजिक बुद्धिमत्तेच्या विनोदबुद्धी या घटकाची तुलना दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ग्रामीण भागातील १३.७ टक्के व १४.७ टक्के ग्रामीण व शहरी भागातील खेळाडूंचे विनोदबुद्धीचे स्तर निम्न आहे. तसेच २३.३ टक्के व १८.० टक्के ग्रामीण व शहरी भागातील खेळाडूंचे विनोदबुद्धीचे स्तर मध्यम असल्याचे आढळले. त्याचप्रमाणे ६३.० टक्के ग्रामीण भागातील व ६७.३ टक्के शहरी भागातील खेळाडूंची विनोदबुद्धी उच्च असल्याचे निदर्शनास आले.

### ३.८ सामाजिक बुद्धीमत्ता – स्मरणशक्ती घटक

**सारणी क्रं. ८:** ग्रामीण व शहरी भागातील खेळाडूंच्या सामाजिक बुद्धिमत्तेची स्मरणशक्ती या घटकाची तुलना दर्शविणारी सारणी

| स्तर | ग्रामीण भागातील खेळाडू | | शहरी भागातील खेळाडू | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | प्रतिशत | संख्या | प्रतिशत |
| निम्न | ६५ | २१.७ | ९२ | ३०.७ |
| मध्यम | ७३ | २४.३ | १८१ | ६०.३ |
| उच्च्व | १६२ | ५४.० | २७ | ९.० |
| एकुण | ३०० | १००.० | ३०० | १००.० |

**काई–वर्गमूल्य:** १४६.९९३; **स्वातंत्र्यांश:** २;
**Pमूल्य=** <0.05; **तालिका मूल्य:** ५.९९

वरील सारणी क्र. ८ मध्ये विदर्भाच्या ग्रामीण व शहरी भागातील खेळाडूंच्या सामाजिक बुद्धिमत्तेची स्मरणशक्ती या घटकाची तुलना दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ग्रामीण भागातील २१.७ टक्के व ३०.७ टक्के ग्रामीण व शहरी भागातील खेळाडूंची स्मरणशक्ती निम्न स्तराची आहे. त्याचप्रमाणे २४.३ टक्के व ६०.३ टक्के ग्रामीण व शहरी भागातील खेळाडूंची स्मरणशक्ती मध्यम असल्याचे आढळले. तसेच ५४.० टक्के ग्रामीण भागातील व ९.० टक्के शहरी भागातील खेळाडूंची स्मरणशक्ती उच्च असल्याचे निदर्शनास आले.

## ४.० निष्कर्ष

### ४.१ सामाजिक बुद्धीमत्ता

- संशोधनात प्राप्त परिणामांवरून असे निदर्शनास येते की विदर्भातील ग्रामीण भागातील बहुतांश खेळाडूंच्या संयमाचे स्तर सरासरी असून शहरी भागांतील खेळाडूंचे संयमाचे स्तर मध्यम आहे.

### ४.२ सामाजिक बुद्धीमत्ता – सहकारिता घटक

- संशोधनात प्राप्त परिणामांवरून असे निदर्शनास येते की विदर्भातील ग्रामीण भागातील बहुतांश खेळाडूंची सहकारिता उच्च्व असून शहरी भागातील खेळाडूंची सहकारिता सरासरी आहे.

### ४.३ सामाजिक बुद्धीमत्ता – आत्मविश्वास घटक

- संशोधनात प्राप्त परिणामांवरून असे निदर्शनास येते की विदर्भातील ग्रामीण भागातील बहुतांश खेळाडूंचे आत्मविश्वास सरासरी असून शहरी भागांतील बहुतांश खेळाडूंचे आत्मविश्वास उच्च आहे.

### ४.४ सामाजिक बुद्धीमत्ता – संवेदनशीलता घटक

- संशोधनात प्राप्त परिणामांवरून असे निदर्शनास येते की विदर्भातील ग्रामीण व शहरी भागातील बहुतांश खेळाडूंची संवेदनशीलता सरासरी आहे.

### ४.५ सामाजिक बुद्धीमत्ता – सामाजिक पर्यावरण ओळख घटक

- संशोधनात प्राप्त परिणामांवरून असे निदर्शनास येते की विदर्भातील ग्रामीण भागातील बहुतांश खेळाडूंची सामाजिक पर्यावरण ओळख उच्च स्तराची असून शहरी भागातील बहुतांश

खेळाडूंची सामाजिक पर्यावरण ओळख मध्यम स्तराची आहे.

४.६ **सामाजिक बुद्धीमत्ता — व्यवहारचातुर्य घटक**

- संशोधनात प्राप्त परिणामांवरून असे निदर्शनास येते की विदर्भातील ग्रामीण भागातील बहुतांश खेळाडूंचे व्यवहार चातुर्य उच्च असून शहरी भागातील बहुतांश खेळाडूंचे व्यवहार चातुर्य मध्यम आहे.

४.७ **सामाजिक बुद्धीमत्ता — विनोदबुद्धी घटक**

- संशोधनात प्राप्त परिणामांवरून असे निदर्शनास येते की विदर्भातील ग्रामीण व शहरी भागातील बहुतांश खेळाडूंचे विनोदबुद्धीचा स्तर उच्च आहे.

४.८ **सामाजिक बुद्धीमत्ता — स्मरणशक्ती घटक**

- संशोधनात प्राप्त परिणामांवरून असे निदर्शनास येते की विदर्भातील ग्रामीण भागातील बहुतांश खेळाडूंची स्मरणशक्ती उच्च असून शहरी भागातील खेळाडूंची स्मरणशक्ती मध्यम आहे.

**५.० आधार ग्रंथसूची**

1. आलेगांवकर, प.म., ‘मानसशास्त्र शिक्षण, शारीरिक शिक्षण, खेळ अर्थात क्रीडा मानसशास्त्र’ प्रकाशक—गजेंद्र विठ्ठल रघुवंशी, रघुवंशी प्रकाशन, २४३(ब), शुक्रवार पेठ, पुणे २, १९८६, १९८९, पृ.क्र. १
2. कांयदे पाटील, गंगाधर वि., ‘शैक्षणिक मानसशास्त्र’ चैतन्य पब्लिकेशन, गंगापूर रोड, नाशिक १३, २००७.
3. बोधनकर सुधीर, अलोनी विवेक, सामाजिक संशोधन पद्धती, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००३.
4. Deol, N. S and Singh, D. (2015). Social Intelligence and Social Support in Basketball Players: A Key to Success, American Journal of Sports Science and Medicine, 3(3), pp. 66-69.
5. Ilyasi, G and Salehial, M. H. (2011). Comparision of Personality traits between individual and team athletes, Middle East Journal of Scientific Research, 9(4), pp.527-530.
6. Mohammad, G and Mohammad, A. (2015). Social Intelligence Between State and National Level Male Volleyball Players: A Comparative Study, Journal of Physical Education Research, 2(3), pp. 79-83.
7. Rani, A. (2019). Relationship of social intelligence and emotional intelligence among sports and non-sports person, International Journal of Physiology, Nutrition and Physical Education, 4(1), pp.1707-1710.
8. www.socialintelligencelab.com